# प्रेसनोट

जा.क्र. २८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– ५/०६/२०१८

## '' बलात्कार करणाऱ्या आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे साकोली अंतर्गत ग्राम शिवणीबांध येथिल आरोपी नामे राधेशाम सखाराम शहारे, वय २५ वर्ष, रा. शिवणीबांध ता. साकोली जिल्हा भंडारा याने पिडित महिला वय ३२ वर्ष हि घरी एकटीच असल्याचे पाहुन घरात प्रवेश करून बलात्कार केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक ५.०६.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश वर्ग २ श्री. सचिन बी. भंसाली सा. यांनी आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व २०००/– रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १५.०६.२०१५ रोजी पिडित महिला तक्रारदार हि सकाळी ८.०० वा. गावातच मजुरी कामावर गेली व पती हे शिवणीबांध तलावावर मासोळया पकडण्यास गेले, पिडित तक्रादार हि ३.३० वा. मजुरी कामावरून घरी परत येवुन घराचे मागे घरगुती कामे करीत असता, गावातील राहणारा राधेशाम शहारे हा आला व पिडितेस तुमचा मुलगा घरी आहे काय याबाबत विचारणा केली, त्यावर मुलगा घरी नसल्याचे पिडितीने सांगल्यावरून राधेशाम शहारे निघुन गेला. ६.०० वा. दरम्यान पिडित महिला आपले घरी स्वयंपाक खोलीत स्वयंपाक करीत असता राधेशाम शहारे हा पुन्हा पिडितेचे घराचे मागचे दारातुन घरात प्रवेश केला व पिडितेचे अंगाला जबरीने पकडले, पिडितेने त्यास प्रतिकार केला परंतु राधेशाम शहारे याने जबरीने पकडुन पिडितेस स्वयंपाक खोली मधुन घराचे मधल्या खोलीत नेवुन बलात्कार केला. पिडितेने पती घरी आल्यानंतर झालेल्या घटणेची हकीकत सांगुण पतीसह पो.स्टे. साकोली येथे जावुन तोंडी तक्रार दिलेवरून, राधेशाम शहारे याचे विरूध्द पो.स्टे साकोली येथे अप.क्र. ७१/१५ कलम ३७६(१) भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास पोलीस उप निरीक्षक दिलीप कुंदोजवार यांनी सुरू करून गुन्हयातील आरोपी राधेशाम सखाराम शहारे यास तात्काळ अटक केले व साक्षपुरावा गोळा

केला. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि दिलीप चुटे यांनी करून आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने गुन्हयात कलम ४४८,४५० भादवि वाढ करून दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ४६/१६ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. सचिन बी. भंसाली सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ५.०६.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे राधेशाम सखाराम शहारे, वय ३२ वर्ष** याचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने कलम **३७६(१) भादवि सात वर्ष सश्रम कारावास व २०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे कारावासाची शिक्षा व कलम ४५० भादवि मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ५००/— रूपये दंड, दंड न भरल्यास एक महिणा कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, रामेश्वर पिपरेवार, ठाणेदार पोलीस ठाणे साकोली यांचे मार्गदर्शनात पोलीस नाईक, विनोद बघेल/२७ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.


(डी. डब्लु. मंडलवार)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
पोलीस मुख्यालय, भंडारा
दुरध्वनी क्र.८८८८९६०५६०


**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.